

# इतिहास - लेख-१०

**कविता मसुरकर, शाळा :** इ.ए.सो. दिगंबर पाटकर विद्यालय, दादर.

विद्यार्थी मित्रांनो,
आज आपण इतिहासाच्या नवव्या प्रकरणाचा अभ्यास करूया. दुसऱ्या महायुद्धानंतर वसाहतवादाचा अंत कसा झाला याची माहिती मिळवूया.

**९. आशिया आणि आफ्रिका यांची बंधमुक्ती**

**निर्वसाहतीकरणाचे युग-** वसाहतवादाचा अंत म्हणजे निर्वसाहतीकरण. अठराव्या शतकात इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगाल इ. पाश्चात्त्य राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रांत आपली सत्ता स्थापन केली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर ही अंकित राष्ट्रे एकामागून एक स्वतंत्र झाली. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत वसाहतवादाचा अंत झाला. यालाच 'निर्वसाहतीकरणाचे युग' म्हणतात.

भौगोलिक शोध व व्यापारवादातून पाश्चात्त्य राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात आपल्या वसाहती कशा स्थापन केल्या हे मागील प्रकरणांमध्ये आपण अभ्यासले आहे. (प्रकरण ४) या वसाहतवादी सत्तांना स्थानिक गटांकडून सशस्त्र विरोध झाला. परंतु शस्त्रबळाने तो दडपून टाकण्यात आला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मात्र या राष्ट्रांमध्ये 'राष्ट्रवादाचा' उदय झाला. **राष्ट्रवादी भावनेच्या उदयाची कारणे-** १) वसाहतींचा पाश्चात्त्य संस्कृतीशी संबंध आला. २) वसाहतीत पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रारंभ झाला. त्यामुळे विवेकवाद, लोकशाही, राष्ट्रवाद अशा उदारमतवादी संकल्पना नवशिक्षितांनी आत्मसात केल्या. ३) वसाहतवादी शासनाच्या शोषक स्वरूपाचे आकलन सुशिक्षितांना झाले. वसाहतींच्या दारिद्र्याला शासन कारणीभूत आहे हे समजले. ४) यातूनच राष्ट्रवादी भावना व स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा उदय झाला. त्यासाठी वसाहतींमध्ये राष्ट्रीय चळवळी संघटित होऊ लागल्या.

**वसाहतींमधील राष्ट्रवादी भावना प्रबळ होण्याची कारणे-** १) पहिल्या महायुद्धकाळात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन व इंग्लंडचे पंतप्रधान फ्रँन्कलिन रुझवेल्ट यांनी पुरस्कृत केलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वामुळे वसाहतींतील दडपलेल्या लोकांच्या आशा पल्लवीत झाल्या. २) पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या वतीने लढलेल्या वसाहतींतील सैनिकांमध्ये, सहकार्याची किंमत म्हणून राजकीय अधिकार मिळतील अशी अपेक्षा होती. ३) जपानने पाश्चिमात्यांच्या अजिंक्यत्वाच्या प्रतिमेला हादरा दिला होता. ४) दुसऱ्या महायुद्धातील प्रचंड आर्थिक हानीमुळे विजयी पाश्चिमात्य वसाहतवादी राष्ट्रे दुबळी बनली होती. ५) अमेरिका व रशिया या महासत्ता वसाहतवादाला प्रतिकूल होत्या. ६) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेत स्वयंनिर्णयाचे तत्त्व समाविष्ट करण्यात आले होते.

अशा प्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक परिस्थिती अनुकूल होताच वसाहतींतील राष्ट्रवादी आंदोलने प्रखर बनली व त्यांना स्वातंत्र्य देणे पाश्चात्त्य राष्ट्रांना भाग पडले.

**निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेतील संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका-** १) स्वयंनिर्णयाच्या अधिकाराचे तत्त्व समाविष्ट करून संयुक्त राष्ट्रसंघाने वसाहतवादाला खंबीरपणे विरोध केला. २) १९५५ च्या बांडुंग परिषदेत २५ आफ्रो- आशियाई स्वतंत्र राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी वसाहतवादाविरुद्ध भूमिका स्पष्ट केली. ३) संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेतील आफ्रो- आशियाई सदस्यांनी 'वसाहतवाद संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेशी विसंगत आहे' असा ठराव संमत केला. ४) १९६१ साली संयुक्त राष्ट्रसंघाची एक विशेष समिती निर्वसाहतीकरणाच्या उद्देशाने स्थापन केली. ५) आम सभेने वेळोवेळी खंबीरपणे वसाहतवादाला विरोध करून वसाहतवादी सत्तांनी वसाहतींवरील ताबा सोडावा, असे आवाहन केले. त्यामुळे विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत आशिया व आफ्रिका खंडातील बहुतेक सर्व वसाहती स्वतंत्र झाल्या व निर्वसाहतीकरण पूर्ण झाले. आशिया व आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाची काही उदाहरणे-

| देश | राष्ट्रवादी चळवळीचेनेते | स्वातंत्र्यप्राप्ती | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| **आशियातील देश:-** | | | |
| १) भारत व पाकिस्तान | गांधीजी, नेहरू इ. | ऑगस्ट १९४७ | आशियातील मुक्त होणारी पहिली वसाहत, पण फाळणी. |
| २) सिलोन | -- | १९४७ अखेर | ब्रिटिश सत्तेविरूद्ध लढा. |
| ३) ब्रह्मदेश | आँगसान | १९४८ च्याप्रारंभी | ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा. |
| ४) इंडो- चीन | हो-ची-मिन्ह | १९७५ | व्हिएतनाम स्वतंत्र राज्य निर्माण |
| ५) इंडोनेशिया | डॉ. सुकार्नो | १९७६ | डच सत्तेविरुद्ध लढा. |
| ६) बांगला देश | -- | १९७१ | पाकिस्तानच्या फाळणीतून निर्मिती |
| **आफ्रिकेतील देश:-** | | | |
| १) घाना | क्वाम नक्रूमा | १९५७ | ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा |
| २) केनिया | जोमो केन्याटा | १९६३ | श्वेतवर्णी शासकांविरुद्ध लढा. |
| ३) दक्षिण ऱ्होडेशिया | रॉबर्ट मुगाबे | १९८० | पेट्रिॲटिक फ्रंट पक्षाने लढा दिला. |
| ४) दक्षिण आफ्रिका | नेल्सन मंडेला | १९१० | वर्णभेदाविरुद्ध लढा. |

अमोल नैसर्गिक संपत्ती, दुबळ्या राष्ट्रवादी चळवळी, अनेक जमातीत विभागलेला आफ्रिकन समाज, पाश्चात्त्य शिक्षणाचा फारसा न झालेला प्रसार यामुळे आशियाच्या तुलनेत आफ्रिका खंडात निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया काहीशी उशिरा सुरू झाली.

**भारतीय राष्ट्रीय चळवळ-** विद्यार्थी मित्रांनो, याचा सविस्तर अभ्यास तुम्ही इयत्ता आठवीत केला आहे. त्यामुळे पुस्तकात अतिशय त्रोटक माहिती दिली आहे. तरी तुम्ही इयत्ता आठवीच्या इतिहास पुस्तकातील प्रकरणे ९ ते १७ पुन्हा एकदा वाचून काढा. म्हणजे उत्तम उजळणी होऊ शकेल.

**भारतीय राष्ट्रीय चळवळीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण-** १) परकीय सत्तांशी संघर्ष करण्यासाठी 'सत्याग्रहाचे' अभिनव शस्त्र या चळवळीने जगाला दिले. २) जगातील अनेक चळवळींवर भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा खोल ठसा उमटला. अमेरिकेचे नेते मार्टिन ल्यूथर किंग व दक्षिण आफ्रिकेचे नेते नेल्सन मंडेला यांनी वर्णभेदाविरुद्ध लढा देताना सत्याग्रहाचा वापर केला आणि भारतीय राष्ट्रीय चळवळीची मौलिकता मान्य केली. ज्यावेळी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी भारतावर सत्ता प्रस्थापित करीत होती; तेव्हा काही राज्यकर्ते, सैनिक, आदिवासी जमाती, धार्मिक संप्रदाय यांनी सशस्त्र विरोध केला. पण त्यामागील प्रेरणा राष्ट्रीयत्वाची नव्हती. एकोणिसाव्या शतकात भारत हे 'एक राष्ट्र' असल्याची जाणीव निर्माण झाली. भारतात राष्ट्रीय भावना उदयाची कारणे- ब्रिटिशांचा एकछत्री अंमल, समान सांस्कृतिक वारसा, समान इतिहास, पाश्चात्त्य शिक्षण आणि लोकशाही, समता, विवेकवाद, व्यक्तिवाद, स्वातंत्र्य, राष्ट्रवाद इ. पाश्चात्त्य उदारमतवादी संकल्पनांशी परिचय यामुळे राष्ट्रीय भावनेचा उदय झाला. यातूनच भारतात वैचारिक प्रबोधन आले. प्रांतिक स्तरावर सुशिक्षित भारतीय आपल्या मूलभूत अधिकारांची धीटपणे मागणी करू लागले. त्यातूनच १८८५ साली ब्रिटिश सनदी अधिकारी ॲलन ऑक्टोवियन ह्यूम यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

**राष्ट्रीय सभेची उद्दिष्टे-** १) राष्ट्रीय ऐक्य स्थापन करणे. २) राष्ट्रीय समस्यांची चर्चा करणे. ३) भारतीयांच्या रास्त मागण्या ब्रिटिश शासनापुढे मांडणे.

राष्ट्रीय सभेची लोकप्रियता वाढत गेली. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या ब्रिटिश शासनाने भेदनीतीचा अवलंब करून हिंदू- मुसलमानांत फूट पाडण्यासाठी बंगालची फाळणी केली. देशभर जनतेने याला प्रखर विरोध केला. सरकारने हे जनआंदोलन दडपून टाकले. यातूनच क्रांतिकारी राष्ट्रवाद जन्माला आला. जहाल तरुणांनी गुप्त संघटनांद्वारे सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारला.

जहाल राष्ट्रीय भावनेला आवर घालण्यासाठी ब्रिटिशांनी एकीकडे राजकीय अधिकारांचे आश्वासन दिले, तर दुसरीकडे जहाल नेत्यांना कडक शिक्षा दिल्या. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी केली. परंतु पहिल्या महायुद्धात भारतीयांचे सहकार्य मिळविण्यासाठी शासकीय धोरणे शिथिल केली. मात्र युद्धसमाप्तीनंतर भारतीयांच्या मूलभूत अधिकारांची गळचेपी करणारा 'रौलट कायदा' संमत केला. तेव्हा जनमत प्रक्षुब्ध झाले.

**सत्याग्रहाचे शस्त्र** याच काळात मोहनदास करमचंद गांधी यांच्याकडे राष्ट्रीय सभेचे नेतृत्व आले. त्यांनी प्रबळ अन्यायी शासनाविरुद्ध लढण्यासाठी सत्याग्रहाचे अभिनव शस्त्र भारतीयांना दिले. गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीयांनी अहिंसा, सत्याग्रह, स्वदेशी, परदेशी मालावर बहिष्कार, जातिनिर्मूलन, हिंदू- मुस्लिम ऐक्य, ग्रामीण उत्थान इ. अनेक कार्यक्रम सुरू केले आणि ती एक राष्ट्रीय संघटना बनली.

**१९२० ते १९४२ च्या काळातील जनआंदोलने-**
१) १९२० ची असहकार चळवळ- २) १९३० चा सविनय कायदेभंग- ३) १९४२ चे छोडो भारत आंदोलन.

**सोमवारचा विषय : विज्ञान II**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com